शिरडीची अधिष्ठात्री देवता संतचूडामणी बाबांच्या पुण्य पदावर लोळून आपल्या पातकांचा नाश करून घेऊन पावन होण्याच्या हेतूनें ८-१० मैल लांबीच्या कोपरगाव क्षेत्राच्या सन्निध वहात असतां पाटबंधारे या रूपानें अगदीं शिरडी गावच्या सीमेत प्रवेश करून बाबांच्या व हल्लीं बाबांच्या समाधीच्या स्नानास येणाऱ्या गांवातील सर्व वापीच्या उदकांशीं एकजीव झाली.

इतक्याही गोष्टी झाल्या तरी बाबांनीं शिरडी हाच गांव आपल्या निवासा-करतां कां पसंत केला हा प्रश्न शिल्लक राहतोच. शिरडी गांवची कथा, आख्या-यिका, महात्म्य, पुराण, किंवा इतिहास उपलब्ध नाहीं. म्हणून शिरडी गांवच्या नावावरून काय बोध होतो हें पाहाण्यावांचून त्यांच्या पसंतीचें महत्व कळण्यास दुसरे साधन नाहीं. बाबांच्या भक्तमालिकेतील श्रीसाईनाथ सगुणोपासना या पुस्तकाचे कर्ते वे. शा. सं. भीष्मशास्त्री यांनीं शिरडी या नांवाची व्युत्पत्ती "शीळधी" अशी लाविलेली आहे, असें श्रीसाई लीलेच्या अकांत त्यांनीं लिहि-लेल्या आपल्या कित्येक लेखात शिरडी ऐवजीं शीलधी या शब्दाचा प्रयोग केल्या-वरून दिसते.

शिरडी हा शब्द तीन तऱ्हेनें उच्चारला जातो. शेरडी, शीरडी किंवा शिरडी.

माझ्या मतें तो शैलधी, शीलधी--धि किंवा सीरधी--धि या तिन्ही संस्कृत शब्दापैकीं कोणत्या तरी एका शब्दाचे अपभ्रष्टरूप असावा. कारण या तिन्ही शब्दांत विशाल, दिव्य, पुण्यपवित्र किंवा श्रेष्ठ बुद्धि किंवा भांडार किंवा निधि असाच अर्थ भरलेला आहे.

वरील तिन्ही शब्दांतील दीर्घ "धी" चा अर्थ बुद्धि व ऱ्हस्व "धि" चा अर्थ सांठा, संचय, निधि, भांडार असा आहे, हें सर्वश्रुत आहे. शिरडी या शब्दांतील "डी" हें अक्षर दीर्घही घेतलें जाईल किंवा ऱ्हस्वही घेतलें जाईल, पण तें "धी" किंवा "धि" याचें अपभ्रष्टरूप असलें पाहिजे.

शलधी:—शैल म्हणजे पर्वत व धी म्हणज बुद्धि. पर्वताप्रमाणे विशाल किंवा श्रेष्ठ बुद्धीचे म्हणजे साक्षात् नारायणरूपी व्यासासारखे ( नमोस्तुते व्यास विशाल बुद्धे ) पुण्य पुरुष अथवा महात्मे ज्या क्षेत्रांत रहात होते किंवा रहातात ते क्षेत्र, शैलधी किंवा शेरडी.

आतां शैलधीचें शेरडी हें अपभ्रष्ट रूप कसें बनले ते पाहूं.

प्रथम " शै " च्या ठिकाणी " शे " झाला. जसे शैवाल--शेवाल. नंतर " ल " च्या ठिकाणीं " र " झाला. जसें नालिकेर:—नारळ

वल्मीकः }
किंवा वामलूर: } --वारूळ

लांगलम्--नांगर

धूलिः किंवा }
धूलिका } --धुराळा

नंतर ' धी ' च्या ठिकाणी ' डी ' झाली. यांत प्रथम " धी " ची " दी " झाली. जसें धात्री--दाई. नंतर " दी " ची " डी " झाली जसे दोहद--डोहळा.

याप्रमाणें शैलधीचें शेरडी हे अपभ्रष्ट रूप बनलें व हें संभवनीयही दिसतें.

आतां शीलधी--धि याचा काय अर्थ होतो तो पाहूं.

शील म्हणजे सदाचार किंवा सद्वर्तन व धी म्हणजे बुद्धि, किंवा धि म्हणजे निधि किंवा भांडार--म्हणजे सदाचार किंवा सद्वर्तनसंपन्न बुद्धीच किंवा सदाचार किंवा सद्वर्तनाचे मूर्तिमंत निधि किंवा भांडार अशा योग्यतेचे सत्पुरुष किंवा महात्मे ज्या क्षेत्रांत रहात होते अगर रहातात तें क्षेत्र शीलधी--धि किंवा शीरडी-डि.

शैलधी या शब्दांतील नियमाप्रमाणेंच शीलधी--धि यांतील " ल " चा " र " व " धी--धि " ची " डी --डि " होते.

आता सीरधी--धि याचा अर्थ काय होतो तो पाहूं.

सीर म्हणजे सूर्य व " धी " म्हणजे बुद्धि किंवा किंवा " धि " म्हणजे भांडार. म्हणजे सूर्याप्रमाणे तेजस्वी बुद्धीचे अलौकिक पुरुष किंवा महात्मे, किंवा सूर्याच्या तेजाचे मूर्तिमंत भांडार अशा योग्यतेच लोकोत्तर तेजस्वी सत्पुरुष किंवा महात्मे ज्या क्षेत्रांत रहात होते किंवा रहात ते क्षेत्र सीरधी--धि म्हणजे शीरडी--डि.

सीरधी--धि यांत र कायम राहिला आहे. " धी--धि " च्या ठिकाणी डी--डि ही वरील नियमाप्रमाणेंच झाली.

आतां फक्त " सी " ची " शी " कशी झाली इतकेंच पहाणें आहे, व तें खालीं दिलेल्या उदाहरणांवरून लक्षात येईल. असें सैवालम्—शेवाळ.

सेरः—शेर ( धान्य मोजण्याचे शेराचें माप )

यावरून वरील तिन्ही संस्कृत शब्दांपैकीं कोण याही एका शब्दाचे शेरडी किंवा शिरडी हें अपभ्रष्ट रूप आहे असें मानलें, तरी पर्वताप्रमाणें विशाल बुद्धीचे अथवा सदाचार किंवा सद्वर्तन संपन्न बुद्धीचे किंवा सदाचाराचे केवळ मूर्तिमंत निधीच अथवा सूर्याप्रमाणें तेजस्वी बुद्धीचे किंवा सूर्यतेजाप्रमाणें केवळ मूर्तिमंत ज्ञानतेजोराशीच असे सत्पुरुष, असे अलौकिक महात्मे, असे निरुपम साधुसंत ज्या क्षेत्रांत रहात होते ते हे शिरडी क्षेत्र असाच त्याचा अर्थ होतो.

संतचरणस्पर्शाने अपवित्र वस्तूसही पावित्र्य यतें. मग शिरडी हा गांव वर दर्शविल्याप्रमाणें मुळचाच अति पवित्र आणि म्हणूनच श्रीगोदातटाकीं असे अन्वर्थक व परमपवित्र क्षेत्र बाबांनीं आपल्या निवासास पसंत केले असावें व त्या ठिकाणीं क्षेत्र संन्यास घेतला असावा असे दिसते.

खरोखरच अशा क्षेत्राचे नुसतें एकवार जरी दर्शन झालें, तरी दर्शन घेणारास सद्गति मिळाल्याशिवाय राहाणार नाहीं. मग जे लोक कांहीं काल किंवा निरंतर बाबांच्या सान्निध्यांत या क्षेत्रांत राहिले असतील अथवा बाबांच्या पश्चात् राहतील अगर राहात असतील ते बाबांच्या पुण्यकृपेस खात्रीने पात्र होऊन त आपल्या अंतिम ध्येयाला पोहोंचतील यांत तिळप्राय शंका नाहीं.

धन्य ती शैलधी, शीलधी-धि किंवा सीरधी--धि धन्यतर ते तत्क्षेत्रस्थ जीव व धन्यतम ते श्रीसद्गुरुराजबाबा.

शिरडी क्षेत्राची सुचलेली व्युत्पत्ति वर दिली आहे. तथापि शिरडी गांवचा पूर्वेतिहास अथवा आख्यायिका कोणास श्रुत असल्यास अथवा वर दिलेल्या व्युत्पत्तिपेक्षां निराळी व जास्त सम्यक् व समाधानकारक व्युत्पत्ति कोणास माहीत असल्यास अगर सुचल्यास ती त्यांनीं कृपा करून पुढील श्रीसाईलीलेच्या एखादे अंकीं छापून प्रसिद्ध केल्यास मी त्यांचा अत्यंत आभारी होईन.

ठाणे,
१-३-२९ बाबांचें बाळ

## श्रीसाईशायनमः

### आमची मातृगया व बाबांचें विश्वव्यापकत्व
### मातृगया म्हणजे सिद्धपूर

शार्दूलविक्रीडित

देवी देवहुती जगज्जननि जी, चिंत्शांति-कांती-खनी।
" सिद्धानां कपिलो मुनिः " प्रसवली श्री कर्दमापासुनी ॥
या स्थानीं म्हणुनीच " सिद्धपूर " त्यां अन्वर्थ संज्ञा वरा।
त्या श्री कर्दम देवहूति कपिला मत्सन्नती आदरां ॥ १ ॥

तारीख २६-१२-२८ रोजीं सायंकाळीं मी माझें कुटुंब सौ. जानकीबाई, माझे दोन मुलगे चि.श्रीनिवास व श्रीपाद, माझा पुतण्या चि.वसंत, माझ्या वडील वहिनी ती राधाबाई ऊर्फ बाई, माझ्या दोन वडील भगिनी तीं. पार्वतीबाई ओझरकर ऊर्फ आऊताई व आनंदीबाई पंडित ऊर्फ मधूताई व माझ्या चुलत सासुबाई ती, मथुराकाकू देवस्थळे अशीं आम्हीं ९ माणसें ठाण्याहून निघून बोरीबंदरच्या स्टेशनवर गेलों. तेथें व्हिक्टोरिया करून कुलाब्याचे स्टेशनवर गेलों. तेथपर्यंत एकदर टांगे, हमाल, रेल्वे व व्हिक्टोरिया वगैरे मिळून खर्च रु.६-१२-०

* १ ज्ञान. २ खाण. ३ त्या स्थानाला ४ जसा अर्थ तसेंच नांव ५ श्रेष्ठ.

झाला. कुलाब्याच्या स्टेशनवर आम्ही प्रत्येकीं रु. ११-३-० प्रमाण कन्सेशनच्या दराने सिद्धपूरचीं ९ रिटर्न तिकिटें तिसऱ्या वर्गाचीं रु. १००-११-० देऊन घेतलीं. येरव्हीं प्रत्येक माणसीं जातायेताच्या तिकिटास रु. १५-८-० पडतात. म्हणजे कन्सेशनमुळे आमचे एकदर रु. ३८-११-० वांचले.

आम्ही रात्रीं कुलाब्याच्या स्टेशनवर ८-४५ ला निघणाऱ्या गुजराथ मेल गाडींत बसलों, व सकाळीं ६-६॥ वाजतां अहमदाबाद स्टेशनवर उतरलों. तेथून सिद्धपूरला जाण्याला लागलीच एक हैद्राबाद मेल ८-४० वाजता निघते, व दुसरी म्हैसाणा मेल ९-३० ला निघते तिकडील रेल्वेगाड्यांची माहिती नसल्यामुळे व सिद्धपूरहून यात्रेकरूंस नेण्याकरितां आलेल्या पंड्याशीं बोलत बसल्यामुळें आमची पहिली गाडी तर चुकलीच. अहमदाबाद स्टेशनवर मोठमोठे उत्तम, स्वादिष्ट व ताजे पेरू त्या वेळीं नेहमींप्रमाणें आले होते. आम्हीं त्यांतले थोडेसे विकत घेतले व पहिल्या गाडीनंतर लवकरच सुटणाऱ्या दुसऱ्या गाडींत जाऊन बसलों. ही गाडी म्हणजे मीटरगेजची ( छोटी ) व तेथूनच निघणारी. यामुळे आम्हांला ऐसपैस मुबलक जागा मिळाली. या स्टेशनवरही प्रयाग, काशी, गया वगैरे क्षेत्राप्रमाणें सिद्धपूरचे पंडे यात्रेकरूंस घेऊन जाण्यास येतात. आम्ही त्या पंड्यास सिद्धपूरला दक्षिणी ब्राह्मणांचीं घरें आहेत किंवा कसें म्हणून विचारतां त्यांनीं तीन चार दक्षिणी ब्राह्मणाचीं घरें असल्याबद्दल सांगितलें. अर्थात् आम्हीं त्यापैकीं करंदीकर भटजीकडे जाणार म्हणून सांगतांच ते परत गेले. आमच्याबरोबर सिद्धपूरला आले नाहींत; पण आम्हीं सिद्धपूरला ११--११॥ वाजतां पोहोंचल्याबरोबर सिद्धपूरच्या स्टेशनवर बरेचसे पंडे आपापल्या चोपड्या घेऊन आमच्याबद्दलची माहिती विचारूं लागले आम्ही सांगे करून करंदीकराकडे गेलों. त्याच्याही घरी आमचा पाठपुरावा करावयास पंड्यांनी सोडिलें नाहीं सरतेशेवटीं अहमदाबादच्या स्टेशनवर जो पंड्या आम्हांस पहिल्याने भेटला तोच आमचा सिद्धपूरचा तीर्थ उपाध्याय असे ठरलें, कारण कोणाकडेच आमच्या कुटुंबापैकीं सिद्धपूरला कोणी गेल्याची माहिती मिळाली नाही. आम्ही करंदीकर भटजींकडे उतरलो. उशीर झाला, करंदीकर घरात नव्हते, त्या दिवशीं

आम्हीं सर्वांनीं श्री प्राची सरस्वतीमाईवर जाऊन स्नान केलें व सायंकाळीं स्वयंपाक करून जेवण केलें. या दिवसांत तेथे थंडी फार होती. आम्हास राहाण्यास जागा पुष्कळ होती. थोडे पांघरण्यास कपडेही करंदीकर यांनीं दिले. आमच्याजवळ होतेच, पण थंडीच्या मानाने ते जरा कमीच पडले. दुसरे दिवशीं आमचा क्षौरविधी, गंगाभेट व तीर्थउपास झाला. तिसरे दिवशीं चतुर्थीचा उपास असल्यामुळें श्राद्धास ब्राह्मणच मिळाले नाहींत. चवथे दिवशीं आम्ही घरींच तीर्थश्राद्धे केलीं. श्राद्ध करणारी मंडळी आमच्यांत ४ होती. तीर्थश्राद्ध म्हणजे भाद्रपद महिन्यांतील पक्षश्राद्धासारखेच असतें. त्यांत सर्व पितराचा उच्चार होतो व पिंडही सर्वांस द्यावे लागतात. तीर्थश्राद्ध करणारी आमच्यांत तीनच मंडळी होती. मी, आमच्या बाई व मथुराकाकु. त्या दिवशीं आमचीं ९ माणसें व तिघांच्या ब्राह्मण सुवासिनी मिळून २० पात्रें झालीं. खर्च दर पात्रीं १-४-० प्रमाणें २५ रु. झाला. बेत श्रीखंड पुरीचा होता' पाचवे दिवशीं मातृगयाश्राद्धें केलीं. तीं मी माझ्या मातुःश्रीचें, माझ्या कुटुंबाच्या मातुःश्रीचें त्यांच्या वतीनें चि-श्रीनिवास यानें नातवास आश्वीन शु. १ समातामहश्राद्ध करण्याचा अधिकार असतो. तसाच त्याला ह्या ठिकाणीं मातामहीचे श्राद्ध करण्याचाही अधिकार आहे असें तेथील ब्राह्मणांनीं सांगितलें ) बाईच्या मातुःश्रीचे बाईनीं व मथुराकाकूंच्या मातुःश्रीचे मथुराकाकूंनीं याप्रमाणे चार श्राद्धें बिंदु सरोवरावर जी धर्मशाळा आहे त्या धर्मशाळेंत केलीं. ब्राह्मण तेथें येण्यास न मिळाल्यामुळें तीं चटावर केलीं व ब्राह्मण व सुवासिनी बिऱ्हाडीं जेऊं घातल्या त्या दिवशीं एकंदर २० पात्रें झालीं. शिरा पुरीचा बेत होता. दर पात्रीं १ रुपयाप्रमाणें २० रु. खर्च आला. बिंदु सरोवरावरील श्राद्धें प्रथम ज्ञानवापींत स्नान करून नंतर अहल्या सरोवरांत स्नान करून नंतर बिंदु सरोवरांत स्नान करून म्हणजे लागोपाठ एकामागून एक याप्रमाणे ओलेत्यांनींच तिन्ही ठिकाणीं स्नान करून मग करावयाचीं असतात. या श्राद्धांत विशेष म्हणजे असा आहे कीं मातेनें आपल्या उदरांत आपला गर्भ धारण केल्यापासून तिच्या उदरांतून आपण बाहेर येऊन आपणास साधारण समजूं लागेपर्यंत आपलें संगोपान कसकसें केलें याबद्दलच्या प्रसंगाचा एकेक संस्कृत श्लोक म्हणून एक श्लोकास एक पिंड याप्रमाणें एकंदर

१६ प्रसंगांची आठवण करून प्रत्येक प्रसंगाचा श्लोक म्हणून १६ पिंड द्याव-याचे असतात त्या वेळीं मनुष्य कितीही कठिण हृदयाचा असला तथापि निदान या १६ प्रसंगी तरी आपल्या मातेस आपल्याकरितां किती तरी कष्ट सोसावे लागले व इतके खडतर कष्ट सोसून निष्कामबुद्धीनें आपले संगोपन कसें केले व या कामी तिचे आपल्यावर किती उपकार झाले व त्या उपकारऋणाचा बोजा आपल्या मस्तकावर किती तरी झाला आहे व आपण आपल्या शरीराच्या कातड्याचे जोडे करून जरी तिच्या पायांत घातले तरी ते तिचे उपकारऋण आपल्या हातून शेंकडो जन्मात तरी फिटेल का ? या व अशाच तिच्या निर्व्याज ममतेच्या अनंत गोष्टींचें स्मरण होऊन, त्याचें अंतःकरण भरून आल्यावाचून व त्याच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहिल्यावांचून राहातच नाहींत.त्या वेळचा प्रसंग अत्यंत करुणरसाचा असाच असतो.

माझ्या वडील भगिनींद्वयांनीं प्रत्येकीं निराळा देवब्राह्मण म्हणून एकेक सुवासिनी ब्राह्मणाचें उदक सोडून करंदीकर भटजीकडेच त्याची जेवणाची सोय केली. पाढरी पोळी तूप साखरेचा बेत होता. पात्रीं ०--१२--० प्रमाणे त्यांनीं भटजीस ३ रुपये व शिवाय भोजन दक्षणा दिली. मीही एक श्री सिद्धेश्वर शंकरावर एकादशनी करून एक सुवासिनी ब्राह्मणाचे २॥ रु. करंदीकर भटजी-सच दिले. अभिषेकाची दक्षणा त्यासच दिली. त्यांच्या कुटुंबास माझ्या कुटुंबाने एक २० रुपये किंमतीचें जरीकाठीं पातळ व पाच रुपये दक्षणा गंगाभेटीची म्हणून दिली. करंदीकर भटजीस संभावना म्हणून मी ५ रुपये व बाकी राहि-लेल्या आमच्यापैकीं ८ मंडळीकडून प्रत्येकीं १ रुपयाप्रमाणें एकंदर १३ रुपये जाते वेळीं देऊन त्यांना वंदन करून त्यांचा आशिर्वाद घेतला.

आमच्या पंड्यास आम्हीं सर्वांमिळून ११--४--० रुपये दिले. आमचें सर्व काम करंदीकर भटजींनीच केले, पंडेबुवानीं कांहींच केले नाहीं. तथापि ते तेथील क्षेत्रउपाध्याय असल्यामुळे व त्यांची उपजीविका यात्रेकरूंवरच असल्यामुळे त्यांना निराश करणे शास्त्रसंमत नाहीं असें वाटल्यावरून व परंपरा चालत आलेल्या रुढीस अनुसरून आम्हीं त्यास वरील दक्षणा दिली. आम्हांस एकंदर

खर्च २१० रुपये आला. या स्थानास श्रीस्थळ किंवा सिद्धपूर सिद्धक्षेत्र सिदपूर किंवा मातृगया असे म्हणतात.

सिद्धपूर महात्म्यावरून असें दिसते कीं, हे ठिकाण पूर्वी कृत किंवा सत्य-युगांत एक मोठे तपोवन होतें. त्रेतायुगात श्रीविष्णु पत्नी लक्ष्मी हिला कांहीं कारणावरून महाक्रोधी दुर्वास ऋषींनीं शाप दिला. त्यामुळें तिने तिन्हीं लोकांचा त्याग करून समुद्रास शरण जाऊन त्याच्या उदरांत आपल्या निवासाकरितां जागा मागून घेतली. दयानिधी सागराने तिच्या विनंतीस मान देऊन तिला आपल्या उदरांत वास करण्यास जागा दिली. त्रैलोक्यांतून लक्ष्मी नाहींशी झाल्या-मुळे तिच्यायोगाने ब्रह्मांडास प्राप्त झालेली प्रभा, कांती व ऐश्वर्य हीं हीं नाहींशी झाली. अवनितलावरील सर्व व्यापार बंद झाले. देव, मानव, यक्ष गंधर्व व इतर सर्व लहान मोठे जीव ह्याना अत्यंत त्रास होऊ लागला. तेव्हां सर्व देव ब्रह्मदेवास घेऊन श्रीविष्णूकडे गेले व श्रीलक्ष्मीमाईस त्रैलोक्यांत परत आणा अशी विनंती केली. विष्णूंनीं त्यांना समुद्रमंथन करण्याची आज्ञा केली. समुद्रमंथनानंतर लक्ष्मीदेवी बाहेर आली तिला आपली कन्या समजून रत्नाकरानें तिला त्यांच्याशीं विवाह करण्याकरितां श्रीविष्णूस अर्पण केली उभयतांचा विवाह झाला. नंतर विश्वरूपी बालक निर्माण करणारे पुरुषप्रकृतीचे दंपत्य अवनितला-वर येऊन प्राची सरस्वतीचे तीरावरील ह्या तपोरण्यांत येऊन पोंचले. आपणास चिरकाल वास करण्यास व एकमेकांचा उपभोग घेण्यास एक रम्य जागा असावी अशी लक्ष्मीदेवीने आपल्या जगन्नायक पतिराजाजवळ इच्छा प्रदर्शित केली. तिच्या इच्छेप्रमाणें एक रम्य नगरी बनविण्यास श्रीविष्णूंनी विश्वकर्म्यास आज्ञा केली, व भगवंताच्या आज्ञेनुरूप विश्वकर्म्याने हें (सिद्धपूर) स्थळ निर्माण केले म्हणून यांस ( श्री-लक्ष्मी ) श्रीस्थल हें नांव प्राप्त झाले.

तपस्तेजाची केवळ मूर्ति ब्रह्मदेवाचे मानसपुत्र व सर्व प्रजा पतींमध्यें श्रेष्ठ असे जे मुनिपुंगव श्री कर्दमऋषी यांनीं पित्राज्ञेप्रमाणे प्रजा उत्पन्न करण्यास सामर्थ्य उत्पन्न व्हावें म्हणून प्राची सरस्वती तटावर दहा हजार वर्षे उग्र तपश्चर्या केली. त्यांना परमात्मदर्शन झालें. व परमात्म्याच्याच आज्ञेने त्यांनीं भगवान मनूची कन्या जगन्माता देवहुति हिचें पाणीग्रहण करून ऋषीचशी प्रजा उत्पन्न केली.

व नंतर " सिद्धानां कपिलो मुनिः " अशी जी प्रत्यक्ष परमेश्वराची विभूति तिचा जन्म याच विश्वपितरांच्या पोटीं याच श्रीस्थलीं झाला म्हणून या स्थलास नंतर सिद्धपूर हे नामाभिधान प्राप्त झालें.

श्री कपिल महामुनींनीं आपली तपोबल निर्मित लावण्यसंपन्न अशापरमपूज्य देवहुती मातुःश्रीला याच स्थलीं ज्ञानवापींत ज्ञानोपदेशकरून तिचा उद्धार केला व प्रत्येक पुत्राने या ठिकाणीं येऊन बिंदु सरोवरीं मातेचें श्राद्ध करून पिंडप्रदान केले म्हणजे त्याच्याही मातेचा उद्धार होतो म्हणून या क्षेत्रास मातृगया असें म्हणतात. याचठिकाणीं भगवान परशरामानें आपल्या मातेस पिंडप्रदान करून मातृहत्येच्या पातका पासून मुक्त झाले व मातेचाही त्यानीं उद्धार केला.

सिद्धपूर हें ठिकाण अहमदाबादेचे बाजूस असून अहमदाबादेहून ३-३॥ तास प्रवासाच्या अंतरावर गायकवाडींत श्री प्राची सरस्वती तीरावर वसलेलें आहे. अहमदाबादेहून ह्या ठिकाणीं जाण्यास मीटरगेज म्हणजे छोटी रेल्वे आहे. हें एक लहानसे टुमदार शहर आहे. या शहराची लोकसंख्या अजमासे ८-१० हजार होईल. या शहरीं मुख्यत्वें करून दोन अडीच हजार बोहरी लोकांची व तितकीच उदीच्या किंवा औदीच्य ब्राह्मणांची वस्ती आहे. शहरांतील रस्ते फारसे रुंद नाहींत. गाव स्टेशनला लागूनच आहे. गांवांत जाण्यास स्टेशनवर टांगे तयार असतात. मातृगयाश्राद्ध करण्याचे ठिकाण बहुतेक गांवाबाहेर आहे. त्या ठिकाणीं प्रथम एक मोठा दरवाजा लागतो. त्यांतून आंत गेले म्हणजे एक मले मोठें आवार लागतें. ह्या आवारांत जिकडे तिकडे फरशी केलेली असून एक सुंदर व विशाल, श्राद्ध सोईसाठीं. धर्मशाळा बांधलेली आहे. या धर्मशाळेला लागूनच एका बाजूस अहल्या सरोवर आहे व धर्मशाळेच्या मागच्या बाजूस पण धर्मशाळेस लागूनच बिंदु सरोवर आहे. धर्मशाळेपासून थोडे अंतरावर एक चिमुकली पाण्याची विहीर आहे तिलाच ज्ञानवापी असें म्हणतात.

प्रथमतः ज्ञानवापीवर संकल्पयुक्त स्नान करून तसेच ओलेत्यांनीं अहल्या सरोवरावर संकल्पयुक्त स्नान करावयाचें व तसेंच ओलेत्यांनीं संकल्पयुक्त स्नान बिंदु सरोवरावर करावयाचें. नंतर सोंवळ्याचें धूत वस्त्र परिधान करून धर्मशाळेंत श्राद्ध करावयाचें. श्राद्धविधी समाप्त झाल्यावर पिंड अहल्या सरोवरांत

टाकून द्यावयाचे. नंतर बिंदु सरोवराचे काठावर असलेल्या देवतांच्या मंदिरांत जाऊन श्री माधव, श्री कर्दम, श्री देवहुती व सांख्यशास्त्र निर्माते श्री कपिल महामुनी वगैरे देवऋषी, तपस्वीनीं व सिद्धांचीं दर्शने घेऊन त्यांना वंदन करून त्यांचेपुढेदक्षणा ठेवून भूयसी वाटावयाची व बिऱ्हाडीं परत यावयाचे. श्राद्धास ब्राह्मण धर्मशाळेत मिळाल्यास तेथेच सर्व भोजनविधि आटोपावयाचा. न मिळाल्यासतेथे चटश्राद्ध करून पिंडप्रदान करून बिऱ्हाडीं येऊन भोजन करावयाचे. नंतर भटजीस व तीर्थ उपाध्यायास संभावना करून त्यांचे आशीर्वाद घ्यावयाचे. म्हणजे मातृगयाविधि संपूर्ण झाला.

ज्या स्थलीं भगवान सांख्यशास्त्र निर्माते कपिल महामुनींनीं आपल्या मातेस आत्मज्ञानाचा उपदेश केला ते स्थळ ज्ञानवापी या नांवाने पुराण प्रसिद्ध आहे.

ब्रह्मपुत्री व देवहुतीची सखी म्हणून कर्दमऋषींच्या आश्रमात आलेली अल्पा हिला देवहुतीच्या ऐश्वर्याचा मत्सर उत्पन्न झाल्यामुळे ती शापित होऊन जलरूप बनली. म्हणून यास अल्पा सरोवर असे म्हणत; परंतु कांहीं कालानंतर देवी श्री अहल्याबाई होळकर यांनीं एका बाजूस घाट बांधून बाकीच्या तिन्ही बाजू दगडांनीं बांधून काढल्यामुळे या अल्पा सरोवरास अहल्या सरोवर असें म्हणू लागले.

कर्दमऋषींना वरप्रदान करण्याकरितां आविर्भूत झालेले भगवान परमात्मा माधव कर्दमांच्या उग्र तपाच्या योगाने अत्यंत प्रसन्न होत्साते त्यांच्या नेत्रांतून आनंदाश्रू पडले. ते ज्या ठिकाणीं पडले त्या ठिकाणाला हर्ष बिंदु सरोवर असें म्हणतात. या सरोवरांत स्नान केल्यामुळे देवहुतीचा देह दिव्य झाला. ह्या सरोवरातील जल पवित्र व रासायनिक व रोगनाशक आहे अशी आख्यायिका आहे.

एकंदरींत श्री प्राची सरस्वतीमाईमुळें व ज्ञानवापी, अल्पा सरोवर व बिंदुसरोवर व बिंदु सरोवरावरील धर्मशाळा व देवतामंदिरे यामुळे या शहरास एक अपूर्व शोभा आली आहे. येथे श्री द्वारका क्षेत्राप्रमाणे सरित्स्नानाबद्दल किंवा देवतादर्शनाबद्दल गायकवाड सरकारचा अगर म्युनिसिपालिटींचा कर नाहीं. येथे दूध भाजीपाला श्रीखंड बासुंदी वगैरे पदार्थ स्वस्त मिळतात.

काशीयात्रा म्हणजे तीन स्थलांचे दर्शन अवश्य झाले पाहिजे. व त्या त्या ठिकाणीं शास्त्रांत लिहिल्याप्रमाणें ते ते विधी केले पाहिजेत. हीं तीन स्थलें म्हणजे प्रयाग, काशी व गया हीं होत याच तीन स्थलांना त्रिस्थली असे म्हणतात. प्रयागास वेणीदान, काशीस भागीरथीस्नान व गयेस पिंडप्रदान असे ते विधी आहेत. मातेच्या निधनानंतर त्रिस्थळी केली असली तरी सुद्धां त्यानें मातेचा उद्धार करण्याकरितां सिद्धपूर येथे बिंदुसरोवरावर पिंडप्रदान करावयास पाहिजे म्हणजे त्रिस्थळींतील गया ही पित्याचे उद्धाराकरितां आहे व सिद्धपूरची गया ही मातेच्या उद्धाराकरितां आहे. म्हणजे पित्याचे व मातेचे अधिकार सारखे आहेत. तिच्या उद्धाराकरिता तिला पित्याप्रमाणे स्वतंत्र स्थान दिले आहे.

सिद्धपूर येथे ज्ञानवापि, अल्पासरोवर व बिंदुसरोवर यांचें जसें व जितकें महात्म्य आहे तसेच व तितकेंच पुण्यसरित् प्राची सरस्वतीचेही आहे.

ही प्राची सरस्वती खालीं दिलेल्या पंचप्राची सरस्वतींपैकीं एक आहे.

**रुद्रावर्ते कुरुक्षेत्रे, पुष्करे श्रीस्थले तथा ।**
**प्रभासे पंचमे तीर्थे पंचप्राची सरस्वती ॥**

भारते.

ह्या प्राची सरस्वतीचा उगम कोटेश्वरानजीक जो अंबाजी नांवाचा पर्वत आहे त्यांत असून ती सिद्धपूर व पाटण या दोन शहरांच्या शिवेंतून वहात जाऊन कच्छचे रेतीड रणांत गुप्त झाली आहे.

प्रयागांत गंगा, यमुना, सरस्वती या तीन वेदप्रसिद्ध पुण्यसरितांचा जो संगम आहे त्यांतील सरस्वती ती ही सिद्धपूरची प्राची सरस्वती नव्हे. त्रिवेणी संगमांतील सरस्वती गिरिराज हिमालयांतून उगम पावून गंगा यमुनेबरोबरच; पण गुप्तरूपानें पूर्व समुद्रास मिळते.

वर वर्णिलेल्या प्राचीन व पुराण स्थळांखेरीज सिद्धपुरांत आणखीही कित्येक पाहण्यासारखीं स्थळे आहेत. त्यात प्राचीन व अर्वाचीन देवालयें, श्रीमान लोकांचे भव्य प्रासाद, रमणीय बागबगीचे असून, विद्युद्दीपांनींही शहराचा पश्चिम

भाग अलंकृत केला आहे. त्यांत आयुर्वेदनिष्णात श्रीधनेश्वरजी महाराज यांचा शांताश्रम आहे. पुढें वैष्णव सांप्रदायाचे आचार्य महाप्रभू वल्लभाचार्य यांनी श्रीमद्भागवताची १०८ पारायणें ज्या ठिकाणीं केलीं ते स्थान आहे. साधु लोकाचा खाख चौक, रामचौक व वर्दमवाडी वगैरे मंदिरें आहेत ब्रह्मचर्याश्रम गोपाळकृष्ण महाराजाचे मंदीर, द्वारकाधीशांचें मंदीर, लक्ष्मीनारायणाचें मंदीर व मम्मादेवीचे वगैरे मंदिरे आहेत. तसेच चंपकेश्वर, हिंगलाज माता, ब्रह्मांडेश्वर वालकेश्वर महादेव, राजभारतीचा मठ, केवळपुरी, सहस्रकलामाता, सरस्वती मंदीर, राधाकृष्ण मंदीर, पंचमुखी हनुमान मंदीर, व हटकेश्वर महादेव मंदीर वगैरे प्रेक्षणीय स्थळे आहेत.

तसेंच या ठिकाणीं गुजराथप्रांताचे अधिपती मूळराज यांचे चिरस्मारक, सोलंकी वंशाचा कीर्तिस्तम्भ, गुजराथ अधिपती सिद्धराजाच्या ऐश्वर्याचें उदाहरण, विश्वाच्या चमत्कृतीचा एक आश्चर्यकारक नमुना, प्राचीन कलांच्या उत्कृष्टतेचे प्रदर्शन असे एक रमणीय, चित्ताकर्षक, भव्य व प्रसिद्ध रुद्रमहालय या नावाचें स्थान होते. या स्थानाचे वर्णन कोणत्याही ग्रंथात अगर इतिहासांत सांपडत नाहीं. त्याचे अवशिष्ट राहिलेले, सिंहद्वार व दुसरा भाग व शहरात कित्येक ठिकाणीं दृष्टीस पडणारी त्याच्या भागाची खिंडारे इतक्याच गोष्टी हल्लीं नजरेस पडतात. रुद्रमहालय म्हणजे एकावर एक अशा अकरा मजल्याचा राजवाडा. यावरून या राजवाड्याची उंची किती असावी हे ध्यानात येईल.

कित्येक विद्वानांचें म्हणणे असें आहे की, हें स्थान राजवाडा नसून ते एक शंकराचे अकरा मजल्याचें मंदीर असावें.

कांहीं लोकांचे म्हणणें असे कीं, गुर्जरदेशाधिपती सिद्धराज याला एक पिशाच वश होतें व त्या पिशाचाच्या साहाय्यानें त्याने या राजवाड्याची रचना केली होती. व त्यांत एक हजार शिवलिंगांची स्थापना करण्यात आली होती. अशा या प्रेक्षणीय स्थलाचा विध्वंस आर्यावर्तांत मुसलमानी राजवैभवाच्या व धर्मांधतेच्या काळाचे वेळी केला असावा असा तर्क आहे.

सत्ययुगांत या रुद्रमहालयाचे जागेवर श्रीशंकरांनी वास केला होता. व त्याच ठिकाणीं मूळराजानें रुद्रमहालयाची रचना केली. या रुद्रमहालयाला पुराणात महालयतीर्थ असें नांव देण्यांत आले आहे. हा मूळराजा अकरावे शतकाची समाप्ति व बारावे शतकाचा प्रारंभ या वेळीं गुजराथेंत राज्य करीत होता.

याप्रमाणे या रुद्द्रमहालय स्थानाची आख्यायिका आहे.

ठाणे.
ता १६–६ -२९

**बाबांचें बाळ.**

आतां बाबांच्या सर्व व्यापकत्वाबद्दल एक दोन अनुभव लिहून हें मातृगया वर्णन पुरें करतों.

आम्ही सिद्धपूरला जाण्याकरितां बोरीबंदरहून व्हिक्टोरिया करून कुलाबा स्टेशनवर आलो तेथे आम्हास एक हमाल भेटला. हा हमाल इतर हमालासारखा त्रासदायक नव्हता. तो सात्विकवृत्तीचा दिसला. तुमच्या सर्व सामानाबद्दल मला रु०–६–० द्या म्हणजे मी तें गाडींत ठेवीन असे तो म्हणाला. आम्ही त्याचे म्हणणे कबूल केले. गाडीच्या वेळेवर तो हातगाडी घेऊन आला. गाडीवर सामान घालून तो आमच्यापुढे चालला व आम्ही त्याच्यामागे जाऊं लागलों. गाडी चिक्कार भरली. आम्हांस बसावयास जागा मिळेना. तो हमाल प्रथम पासूनच म्हणे कीं, बायका माणसे व सामान जवळच्याच रिकामे असलेल्या बायकांच्या डब्यांत ठेवा व तुम्हीही जवळच्याच डब्यात बसा. परंतु सर्व मंडळी बसण्याची व सामान ठेवण्याची व्यवस्था एकाच डब्यांत झाली तर चांगली असें आम्हास वाटे. तो म्हणे जवळच्या रिकाम्या डब्यात बायकांस बसूं द्या व त्यातच सामान ठेवा व तुम्ही त्याच्या जवळच्याच डब्यात बसा. परंतु बायकांच्या डब्याजवळील डब्यांत तर माणसे बसलेलीं होतीं. त्यांनी आपले लांबलचक बिछाने खालच्या व वरच्या सर्व जागेवर पसरलेले होते व डबा बंद करून घेतला होता. अशा स्थितींत आम्हीं त्यात बसावे कसे ? आम्हीं त्या हमालाचें न ऐकतां मागून पुढें व पुढून मागे असें एकदोन हेलपाटे तर खाल्ले. जागा मिळेना. तो हमाल तर परोपरीने त्याने सांगितल्याप्रमाणे आम्ही करावें अशी आमची विनवणी

## अध्याय ५१ वा.

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः ।

श्रीकुलदेवतायै नमः । श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ।

॥ श्रीसद्गुरुसाईनाथाय नमः ॥

जयजय साई भक्ताधारा । गीतार्थप्रकाशका गुरुवरा ॥
सर्व सिद्धीचिया दातारा । कृपा करा मजवरी ॥ १ ॥

करावया निदाघशमन । मलयागिरीं उगवे चंदन ॥
अथवा सुखवावया विश्वजन । वर्षतो घन भूमीवरी ॥ २ ॥

किंवा देवाचें व्हावया पूजन । प्रकटे वसंतसमयीं सुमन ॥
अथवा कराया श्रोतृसमाधान । उद्भवा ये आख्यान पर्ंपरा ॥ ३ ॥

ऐकतां हें साई चरित्र । श्रोते वक्ते दोघेही पवित्र ॥
पवित्र ऐकती त्यांचे श्रोत्र ॥ पवित्र वक्त्र[2] वक्त्याचें ॥ ४ ॥

गता ध्यायीं अज्ञान निरसन । होतां कैसें प्रकटे ज्ञान ॥
'तद्विद्धि प्रणिपातेन[3]' । श्लोकार्थ निरूपण जाहलें ॥ ५ ॥

भगवद्गीता परिसमाप्ती । अठराविया अध्यायाअंतीं ॥
बहात्तरावे श्लोकाप्रांतीं ॥ अर्जुना पुसती श्रीकृष्ण ॥ ६ ॥

---

१ उष्णता. २ मुख. ३ भगवद्गीता अ० ४, श्लोक ३४ वा.

यथवरी जें जाहलें प्रवचन । तेणें झालें का मोहनिरसन ॥
हाच स्पष्ट केला कीं प्रश्न । झालें का ज्ञान पुसिलें ना ॥ ७ ॥

तैसीच पार्थेही दिधली पावती । मोह माझा गेला दिगंतीं ॥
म्हणे ना झाली मज ज्ञानप्राप्ती । मोहविच्छित्तीच जाहली म्हणे ॥ ८ ॥

मोहनाम केवळ अज्ञान । दिसाया मात्र शब्द दोन ॥
अर्थावबोध नाहीं भिन्न ॥ गीतार्थज्ञ जाणती ॥ ९ ॥

' यत्त्वयोक्तंवचस्तेन '[1] । ' मोहोऽयं विगतो '[2] जाण ॥
अकरावे अध्याया आरंभीं अर्जुन । करी हेंचि कथन श्रीकृष्णा ॥१०॥

आतां सांप्रत अध्याय नूतन । आरंभीं काकासाहेबां लागून ॥
कैसें शिर्डींत केलें स्थापन । करूं तें विवेचन नवलाचें ॥ ११ ॥

त्यांचा शिर्डीचा ऋणानुबंध । त्यांचा साईशीं दृढसंबंध ॥
कैसा मुळींचा कारणनिर्बंध । ऐका तो संबंध आमूल ॥ १२ ॥

कथा त्यांच्या आहेत बहुत । लहानथोरां सर्वां विदित ॥
परी ते आरंभीं कैसे शिर्डीप्रत । आले तें अविश्रुत सकळांस ॥ १३ ॥

पूर्व पुण्याईच्या गोष्टी । तेणे परमेश कृपा दृष्टी ॥
तेणेंच पुढे सद्गुरुभेटी । स्वानंदपुष्टी शिष्यास ॥ १४ ॥

यासह आतां हा अध्याय । श्रोतयां वर्णील कथात्रय[3] ॥
तीन भक्तांचा हा महोदय । श्रोत्यांचें हृदय निववील ॥ १५ ॥

इतर उपाय कोट्यानकोटी । करा परमार्थ प्राप्तीसाठीं ॥
होतां न सद्गुरुकृपादृष्टि । पडेना गांठीं परमार्थ ॥ १६ ॥

---

१ आपण जो मला उपदेश केला त्यानें. २ हा माझा मोह, हें माझें अज्ञान नाहींसें झालें. ३ तीन गोष्टी. ४ हरी सीताराम दीक्षित.

येअर्थींची कथा गोड । श्रवण करितां पुरेल कोड ॥
श्रोतया मनीं प्रकटेल आवड । वाढेल चाड निजस्वार्थी ॥ १७ ॥
गुरुभक्तांचें समाधान । तो हा अध्याय परमपावन ॥
श्रोतांचित्तें सावधान । करावा श्रवण हितकर ॥ १८ ॥
हरी सीताराम दीक्षित । काकासाहेब नांवें जे विश्रुत ॥
सकल साई बाबांचे भक्त । आदरें ज्यां स्मरत प्रेमानें ॥ १९ ॥
तयांची ती पूर्वपीठिका । आनंददायक बहुश्रुत रसिकां ॥
सादर कथितों भक्तभाविकां । चरित्र श्रवणोत्सुक सुखार्थ ॥ २० ॥
सन एकोणीसशें नऊपर्यंत । पूर्वी साई हे नांव ज्यां अपरिचित ॥
तेच पुढे साईचे परम भक्त । सर्वविश्रुत जाहले ॥ २१ ॥
विश्वविद्यालय शिक्षणानंतर । कित्येक वर्षें लोटलीयावर ॥
नानासाहेब चांदोरकर । आले लोणावळ्यावर[1] एकदां ॥ २२ ॥
दीक्षित त्यांचे जुने स्नेही । भेटी झाल्या फार वर्षांही ॥
सुखदुःखाच्या वार्ता त्यांही । परस्परांही त्या केल्या ॥ २३ ॥
लंडन शहरीं गाडींत चढतां । दीक्षितांचा पाय घसरतां ॥
जाहली त्या पायांजी व्यथा । शमेना उपायशतांही[2] ॥ २४ ॥
त्या व्यथेची साद्यंत वार्ता । सहज निघाली संभाषण करितां
तेथें श्रीसाईबाबांची उपयुक्तता । आठवली चित्तांत नानांच्या ॥ २५ ॥
तो पायाचा लंगडेपणा । निःशेष जावा येते का मना ? ॥
चला माझिया गुरूचे दर्शना । ऐसें तंव नाना वदले तयां ॥ २६ ॥

---

१ या ठिकाणीं कै०वा० काकासाहेबांचे बंगले अजून आहेत. २ शेकडों उपाय झाले तरी.

मग नानांही नवल विशेष । म्हणून साईचें वृत्त अशेष ॥
कथिलें आनंदें दीक्षितांस । संतावतंस महिम्यातें " ॥ २७ ॥

" माझें माणूस कितीही दूर । असेना साता समुद्रापार ॥
चिडीसारखा मी बांधुनि दोर । ओढूनि सत्वर आणितों ॥ २८ ॥

ऐसें बाबांचें नित्य वचन । वरी नानांही केलें प्रवचन ॥
म्हणाले बाबांचे नसल्या आपण । होणें न आकर्षण तयांचें ॥ २९ ॥

तुम्ही तयांचे असल्यावीण । होणार नाहीं तुम्हां दर्शन ॥
हीच बाबांची मोठी खूण । तुम्ही कां आपण जातां तिथें ? ॥ ३० ॥

असो हें ऐकून साईचें वर्णन । दीक्षितांचें धालें अंतःकरण ॥
मग ते म्हणाले नाना लागून । घेतों मी दर्शन बाबांचें ॥ ३१ ॥

माझी या पायाची काय कथा । सकल देहाची नंश्वरावस्था ॥
राहेना सुचिर पायाची व्यथा । नाहीं मज चिंता तदर्थे ॥ ३२ ॥

जातों मी आपुलीया गुरूचे दर्शना।परी तें निरतिशय सौख्य संपादना॥
अल्पसुखाची नाहीं मज कामना । त्याची न याचना करीं मी ॥ ३३ ॥

ब्रह्मावेगळें नाहीं सुख । तेंच एक सुख अमोलिक ॥
होईन मी तुमच्या गुरुचा पायिक । या एक अमोलिक सुखास्तव ॥३४॥

असो पायाचा लंगडेपणा । त्याची न मज कांहीं विवंचना ॥
परी माझिया लंगडिया मना । ताळ्यावरी आणा प्रार्थना ही ॥ ३५ ॥

बहुत शिणलों करितां साधन । परी न निश्चळ राही मन ॥
प्रयत्ने ठेवूं म्हणतां स्वाधीन । जाई ते निसटून नकळत ॥ ३६ ॥

---

१ या संतशिरोमणींचा माहमा. २ देहाची नाशवंत स्थिति. ३ वाटेल तितका वेळ. ४ आत्यंतिक.

कितीही असावें सावधान । अत्यंत मनोनिग्रह करून ॥
कधीं जाईल नजर चुकवून । आश्चर्य गहन मनाचें ॥ ३७ ॥
तरी मी नाना मनापासून । घेईन तुमच्या गुरूचें दर्शन ॥
माझिया मनाचें लंगडेपण । घालवा मी प्रार्थीन तयांतें ॥ ३८ ॥
नश्वर शरीरसौख्यीं उदास । जया आत्यंतिक सुखाची हौस ॥
ऐशिया भक्तांचे परमार्थास । परम उल्हास साईस ॥ ३९ ॥
धारा सभेची निवडणूक । सर्वांठायीं हा विषय एक ॥
जिकडेतिकडे अनेक लोक । गुंतले सार्वत्रिक या कामीं ॥ ४० ॥
काकासाहेबही अपुलेसाठीं । मिळवावया लोकमतपुष्टी ॥
फिरत असतां स्नेह्यांच्या भेटी । पातले उठाउठी नगरास ॥ ४१ ॥
काकासाहेब मिरीकर । नामें एक तेथील सरदार ॥
दीक्षितांचा घरोबा फार । उतरले सुखकर त्या स्थानीं ॥ ४२ ॥
त्याच समयास अनुसरून । होतें नगरीं घोड्यांचे प्रदर्शन ॥
तदर्थ नानाप्रकारचे जन । होते कीं निमग्न त्या कामीं ॥ ४३ ॥
बाळासाहेब मिरीकर । कोपरगांवचे मामलेदार ॥
प्रदर्शनार्थ होते हाजर । अहमदनगर शहरांत ॥ ४४ ॥
तदर्थ दीक्षित आले तेथें । कार्य तें अवघें आटपलें होतें ॥
शिर्डीस कैसें जाणें घडतें । कोण मज नेतें तेथवर ॥ ४५ ॥
करितां तेथील कार्यभाग । दिसों लागला शिर्डीचा मार्ग ॥
घडावा बाबांचा दर्शनयोग । हा एकचि उद्योग दीक्षितां ॥ ४६ ॥
येईल कोण मजबरोबर । नेईल कोण बाबांचे समोर ॥
घालील मज त्यांचे पायावर । काळजी अनिवार दीक्षितां ॥ ४७ ॥

निवडणुकीचें काम सरतां । कैसें जावें शिरडीस आतां ॥
लागून राहिली दीक्षितां चिंता । विनविती सादरता मिरीकरां ॥ ४८

काकासाहेब मिरीकर । यांचे बाळासाहेब हे कुमर ॥
विचार करिती परस्पर । दीक्षितांबरोबर कोण जातो ॥ ४९ ॥

दोघांपैकीं कोणीही एक । असल्यास सांगाती नको आणीक ॥
तरी मग जावें कोणी निश्चयात्मक । चालला आवश्यक विचार ॥

मनुष्याच्या मानवी कल्पना । ईश्वराची आणीक योजना ॥
दीक्षितांचे शिर्डीच्या गमना । अकल्पित घटना प्रकटली ॥ ५१ ॥

इकडे ऐसी तळमळ । दुसरीकडे पहा चळवळ ॥
पाहूनि भक्ताची इच्छा प्रबळ । समर्थ कळवळले कैसे ॥ ५२ ॥

एवं विचारारूढ दीक्षित । बैसले असतां तेथें सचित्त ॥
माधवरावचि आले नगरांत । आश्चर्यचकित जन अवघे ॥ ५३ ॥

माधवरावांस त्यांचे श्वशुर । नगराहून करिती तार ॥
सासू आपुली फार बेजार । भेटीस या सत्वर सहकुटुंब ॥ ५४ ॥

तार येतांच केली तयारी । मिळतांच बाबांची अनुज्ञा वरी ॥
घेवोनियां कुटुंब बरोबरी । गेलीं चिथळीवरी तीं दोघें ॥ ५५ ॥

तीन वाजाची गाडी गांठली । उभयतां तीं नगरा गेलीं ॥
गाडी येऊन द्वारीं थडकली । उतरती खालीं उभयतां ॥ ५६ ॥

इतक्यांत नानासाहेब पानशे । आपासाहेब गद्रे असे ॥
पातले तेथें प्रसंगवशें । प्रदर्शन मिषे त्या मार्गें ॥ ५७ ॥

---

१ माधवराव बळवंत देशपांडे राहणार शिर्डी. १ चिथळी स्टेशनाव

माधवराव खालीं उतरतां । दृष्टीस पडले यांचे अवचिता ॥
वाटली तयां अति विस्मयता । आनंद चित्ता नसमाये ॥ ५८ ॥

म्हणती पहा हे येथें सुदैवें । माधवराव शिर्डीचे बडवे ॥
याहून आतां कोणी हो बरवें । शिर्डीस न्यावें दीक्षितां ?॥ ५९ ॥

मग तयातें मारूनि हांका । म्हणती आले दीक्षित काका ॥
मिरीकरांचे येथें जा देखा । कौतुक अवलोका बाबांचें ॥ ६० ॥

दीक्षित अमुचे स्नेही अलौकिक । तुमची त्यांची होईल ओळख ॥
शिर्डीस जाया ते अत्यंत उत्सुक । तुमच्या आगमनें सुख त्यांतें ॥६१॥

देऊनि ऐसा निरोप त्यांना । वृत्त हें कळविलें दीक्षितांना ॥
ऐकोनि हरली त्यांचीही विवंचना । संतोष मना अत्यंत ॥ ६२ ॥

श्वसुरगृहीं जाऊनि पाहती । सासूचीही ठीक प्रकृति ॥
माधवराव थोडे विसवती । मिरीकर धाडिती बोलावूं ॥ ६३ ॥

बोलावण्यास देऊनि मान । होतां थोडा अस्तमान ॥
माधवराव गेले निघून । दिक्षितां लागून भेटावया ॥ ६४ ॥

हीच त्यांची प्रथम भेट । बाळासाहेब घालिती गांठ ॥
रात्री दहाचे गाडीचा घाट । ठरला कीं स्पष्ट दोघांचा ॥ ६५ ॥

ऐसा हा बेत ठरल्यावरी । पुढें पहा नवलपरी ॥
बाळासाहेब सारिती दूरी । पडदा बाबांचे छबीवरील ॥ ६६ ॥

हें बाबांचें छायाचित्र । मेघा बाबांचा निःसीम छात्र ॥
परमप्रेमें पूजी पवित्र । शंकर हा त्रिनेत्र भावुनी ॥ ६७ ॥

कांच फुटली झालें निमित्त । म्हणूनियां ती व्हावया दुरुस्त ॥
बाळासाहेबांसवें नगरांत । आरंभीं निघत शिर्डीहून ॥ ६८ ॥

तीच ही तसबीर होऊन दुरुस्त । दीक्षितांची जणूं वाटचि पहात ॥
मिरीकरांचे दिवाणखान्यांत । होती वस्त्रावृत ठेविलेली ॥ ६९ ॥
अश्वप्रदर्शन समाप्तीस । बाळासाहेब परतावयास ॥
होता अजून थोडा अवकाश । म्हणून माधवरावास सोपिली ॥ ७० ॥
पडदा सारूनि केली अनावृत । माधवरावांस केली सुपूर्त ॥
म्हणाले बाबांचिया समागमांत । शिर्डीपर्यंत जावें सुखें ॥ ७१ ॥
तव ती सर्वांगमनोहर । प्रथम दृष्टी पडतां तसबीर ॥
काकासाहेब आनंदनिर्भर । प्रणिपात पुरःसर अवलोकिती ॥ ७२ ॥
पाहोनियां ती घटना विचित्र । तैसेंच अकल्पित रम्य पवित्र ॥
समर्थ साईचे छायाचित्र । वेधले नेत्र दीक्षितांचे ॥ ७३ ॥
जयांचे दर्शनीं धरिला हेत । तयांची प्रतिमा ही मूर्तिमंत ॥
मार्गींच यात्री अवलोकनांत । आल्हाद अत्यंत जाहला ॥ ७४ ॥
तीही यावी शिर्डीहूनी । काकासाहेब मिरीकर भवनीं ॥
तेच वेळीं दीक्षित ते स्थानीं । योग हा पाहोनि विचित्र ॥ ७५ ॥
जैसा दीक्षित मनीं भावार्थ । तैसा पुरवावया साईसमर्थ ॥
वाटले या मिषें आले तेथ । मिरीकर भक्त भवनास ॥ ७६ ॥
लोणावळयास नानांचें दर्शन । तयांसवें झालेलें भाषण ॥
तेथेंच बाबांचें गुरुत्वाकर्षण । बीजारोपण भेटीचें ॥ ७७ ॥
नातरी ही शिर्डीची छवी । याच वेळीं येथें कां यावी ॥
इतुका वेळ कां आवृत असावी । येथेच कां रहावी पांयातळीं ॥ ७८ ॥

१ ती शिर्डीस नेण्याची कामगिरी माधवरावजीवर निरवली. २ उघडी. ३ हवाली केली. ४ घरीं.

असो ऐसें होतां निश्चित । घेऊनियां ती छबी समवेत ॥
माधवराव आणि दीक्षित । निघाले आनंदित मानसें ॥ ७९ ॥

तेच रात्रीं भोजनोत्तर । दोघेही गेले स्टेशनावर ॥
भरोनि दुसरे वर्गाचा दर । तिकीटें बरोबर घेतलीं ॥ ८० ॥

दहाचा ठोका पडतां कर्णीं । येऊं लागला अग्निरथ ध्वनी ॥
दुसरा वर्ग चिक्कार भरुनी । गेला हे नयनीं अवलोकिलें ॥ ८१ ॥

प्रसंग ऐसा येऊनि पडतां । दोघांसि लागली दुर्धर चिंता ॥
वेळही थोडा उरला आतां । करावी व्यवस्था कैसी पां ॥ ८२ ॥

असो आतां या गर्दीचे पायीं । परत जावें आलिया ठायीं ॥
निश्चय केला हा दोघांही । जावें कीं शिरडीस उदयीक ॥ ८३ ॥

इतक्यांत गाडीचा गार्ड अवचितां । ओळखीचा दिसला दीक्षितां ॥
पहिल्या वर्गांत बसण्याची व्यवस्था । केली निर्धोरता तयानें ॥ ८४ ॥

पुढें गाडींत होतां उपस्थित । चालल्या बाबांच्या गोष्टी मनसोक्त ॥
माधवराव कथित कथामृत । आनंदें ओसंडत दीक्षित ॥ ८५ ॥

ऐसें त्या मार्गीं सुख परवडी । वेळ गेला अति तांतडी ॥
कोपरगांवीं पातली गाडी । आनंद निरवडी उतरले ॥ ८६ ॥

तेच समयीं स्टेशनावर । नानासाहेब चांदोरकर ॥
पाहूनि दीक्षित आनंदनिर्भर । भेटले परस्पर अकल्पित ॥ ८७ ॥

तेही घ्यावया बाबांचें दर्शन । निघाले होते शिर्डीलागून ॥
हा अनपेक्षित योग पाहून । विस्मयापन्न तिघेही ॥ ८८ ॥

मग ते तिघे तांगा करून । बोलत चालत निघाले तेथून ॥
मार्गांत करून गोदावरी स्नान । पातले पावन शिर्डींत ॥ ८९ ॥

पुढें होतां साईचें दर्शन । दीक्षितांचें द्रवलें मन ॥
नयन झाले अश्रुपूर्ण । स्वानंद जीवन ओसंडलें ॥ ९० ॥
मीही तुझी पाहूनि वाट । पुढे शाम्यास पाठविला थेट ॥
नगरास तुझी घ्यावया भेट । वदले मग स्पष्ट साई तयां ॥ ९१ ॥
रोमहर्षित दीक्षित शरीर । कंठीं दाटला बाष्पपूर ॥
चित्त जाहलें हर्षनिर्भर । घर्म सर्वांगीं दरदरला ॥ ९२ ॥
देह सूक्ष्म कंपायमान । चित्तवृत्ति स्वानंदनिमग्न ॥
नेत्र पावले अर्धोन्मीलन । आनंदघन दाटला ॥ ९३ ॥
आज माझी सफलदृष्टी । म्हणोनि चरणीं घातली मिठी ॥
मना धन्यता वाटली मोठी । आनंद सृष्टीं न समाये ॥ ९४ ॥
पुढें वर्षांचीं वर्षें गेलीं । साई चरणीं निष्ठा जडली ॥
पूर्ण साईची कृपा संपादिली । सेवेसी वाहिली निज काया ॥ ९५ ॥
यथासांग सेवाही चांगली । करण्यालागीं मठीही बांधिली ॥
शिर्डींत बहुसाल वस्तीही केली । महती वाढविली साईंची ॥ ९६ ॥
सारांश त्याचा जो धरितो काम । निश्चयें तयासी करी निष्काम ॥
साई निजभक्तविश्रामधाम[1] । भक्तांसी परम सुखदायी ॥ ९७ ॥
चंद्राचकोर अपरिमीत । चकोरा एकचि नक्षत्रनाथ[2] ॥
तैसे तिजला सुत जरी बहुत । माता ती अवघ्यांस एकची ॥ ९८ ॥
दिनकरा कुमुदिनी अपार । परी कुमुदिनीस एकचि दिनकर ॥
भक्तां तुझीया नाहीं पार । पिता तूं गुरुवर एकलाची ॥ ९९ ॥
मेघा आतुर चातक कैक । मेघ तेथूनि चातकां एक ॥
तैसे त्याचे भक्त अनेक । जननीजनक तो एक ॥ १०० ॥

---

१ आश्रम घर. २ चंद्र.

स्मरण जेजे सद्भावें सहज । त्यांची त्यांची रक्षूनि लाज ॥
आवडी निजांगें पुरवितो काज । पाहतसों आज प्रत्यक्ष ॥ १०१ ॥
जगीं जो जो प्राणी जिवंत । मरण करणार तयाचा अंत ॥
साई दीक्षितां अभय देत । " तुज मी विमानांत नेईन " ॥ १०२ ॥
जैसा साईवाचादत्त । तैसाच झाला दीक्षितां अंत ॥
वाचेनें साईचे गुणगण गात । देखिले मी साक्षात् निज डोळां ॥ १०३ ॥
अग्निरथीं एका बाकावर । बसलों असतां आम्ही परस्पर ॥
समर्थ साईच्या वार्तांत चूर । विमानीं जणूं भरकन आरूढले ॥ १०४ ॥
पहा साधिली अवचित संधी । मान देऊनि माझिये स्कंधीं ॥
पावले अवचित विमानसिद्धी । सौख्य निरवधि दीक्षित ॥ १०५ ॥
नाहीं आळा नाहीं पीळ । नाहीं घरघर नाहीं कळ ॥
बोलतां चालतां देखतां सकळ । शरीर निश्चळ राहिलें ॥ १०६ ॥
मानवभुमिका ऐसी विसर्जिली । निजरूपीं निजज्योती मिळविली ॥
विमानमार्गें स्वरूपीं स्थापिली । ज्योतींत समरसली निज ज्योत ॥ १०७ ॥
साईंचरणीं लागतां ध्यान । गळाला पूर्ण देहाभिमान ॥
वृत्ती पावली समाधान । पूर्ण कृष्णार्पण देहास ॥ १०८ ॥
शके अठरासें अठ्ठेचाळीस । ज्येष्ठ वद्य एकादशीस ॥
दीक्षित पावले ब्रह्मपदास । या कर्मभूमीस त्यागुनी ॥ १०९ ॥
म्हणा हें त्यांचें देहावसान । अथवा तयातें आलें विमान ॥
झाले ते साईपदविलीन । कोणासही प्रमाण ही गोष्ट ॥ ११० ॥
ऐशा उपकारा व्हावें उत्तीर्ण । ऐसें भावी तो अभक्तपूर्ण ॥
द्रव्यदानें उतरायीपण । स्वप्नींही जाण घडेना ॥ १११ ॥

चिंतामणी देऊं पहाल । नित्य चिंता वाढवाल ॥
तेणें अचिंत्यदानिया व्हाल । उतराई हा बालनिर्णय ॥ ११२ ॥
बरें कल्पतरूही घ्याल । गुरूस जाल कराया न्यहाल ॥
गुरु निर्विकल्पदानीं कुशल । उत्तीर्णता होईल का तेणें ॥ ११३ ॥
आतां असो या सर्वांपरीस । गुरूस देऊं पहाल परीस ॥
परीस लोहाचें सुवर्ण सरस । करील गुरु ब्रह्मरस पाजील ॥ ११४ ॥
कामधेनू अर्पाल गुरूस । उत्तीर्ण मानाल गुरूपकारास ॥
कामना वाढवाल असंमसाहस । निष्कामनिरायासदानी गुरू ॥ ११५ ॥
अखिल विश्वामाजील संपत्ती । देऊनि गुरूपकार फेडूं जे इच्छिती ॥
अमायिक दात्या जे मायिक अर्पिती।येणें का पावती उत्तीर्णता ॥११६॥
देह ओवाळूं गुरूवरून । तरी तो केवळ नश्वर जाण ॥
जीव सांडावा ओवाळून । तरी तो जाण मिथ्यासर्वें ॥ ११७ ॥
सद्गुरु सत्य वस्तुचा दाता । तया मिथ्या वस्तू अर्पितां ॥
उतरायी काय होईल दाता । आहे ही वार्ता अशक्य ॥ ११८ ॥
म्हणोनि अनन्य श्रद्धापूर्ण । घालोनी दंडवत लोटांगण ॥
मस्तकीं वंदा सद्गुरु चरण । उपकारस्मरणपूर्वक ॥ ११९ ॥
अखंड गुरूपकारस्मृति । हेंच भूषण शिष्याप्रती ॥
त्यांतून उत्तीर्ण होऊं जे पाहती । निज सुखा आंचवती ते शिष्य॥१२०॥
कथा इतुकी होतां श्रवण । श्रोतयांची वाढली तहान ॥
जिज्ञासापूर्ण आतुरता पाहून । कथा एक लहान निवेदितों ॥ १२१ ॥
संतही अपुलें बंधुप्रेम । व्यक्त करिती संसारियां सम ॥
अथवा दक्ष लोकसंग्रहीं परम । असती हें वर्म जाणवती ॥ १२२ ॥

---

१ मुलाचा सिद्धांत. २ गुरूने केलेल्या उपकारास. ३ अद्भुत.

किंवा स्वयें साईच आपण । करावया निजभक्त कल्याण ॥
त्या त्या भूमिका निजांगें नटून । परमार्थ शिक्षण देतात ॥ १२३ ॥
ये अर्थीची त्रोटक कथा । सादर श्रवण कीजे श्रोतां ॥
कळेल जेणे न सांगतां सत्वरतां । संतांची संतां निजखूण ॥ १२४ ॥
एकदां श्रीगोदातीरीं । प्रसिद्ध राजमहेंद्री शहरीं ॥
आली श्रीवासुदेवानंदाची स्वारी । उपनामधारी सरस्वती ॥ १२५ ॥
महाथोर अंतर्ज्ञानी । कर्ममार्गाचे कट्टे अभिमानी ॥
अखंड ज्याची कीर्ति स्वर्धुनी[1] । राहिली गर्जुनी महीतळीं ॥ १२६ ॥
कर्णोपकर्णी वार्ता परिसुनी । पुंडलीकराव[2] आदिकरूनी ॥
नांदेड शहरींच्या भाविकजनीं । धरिला दर्शनीं दृढ हेत ॥ १२७ ॥
असो पुढें ती मंडळी निघाली । राजमहेंद्री नगरीं पातली ॥
गोदे काठीं प्रातःकाळीं । दर्शना आली स्वामींच्या ॥ १२८ ॥
समय होता सुप्रभात । नांदेडकर मंडळी समस्त ॥
निघाली स्नानार्थ गंगेप्रत । मुखानें गात स्तोत्रपाठ ॥ १२९
तेथेच स्वामी देखोनी स्थित । मंडळीसद्भावें साष्टांग नमित ॥
सहज कुशल प्रश्न चालत । वार्ता तों निघत शिर्डीची ॥ १३० ॥
कर्णीं पडतां साईनाम । स्वामी स्वकरें करीत प्रणाम ॥
म्हणाले ते अमुचे बंधु निष्काम । आम्हांसी निःसीम प्रेम त्यांचें॥१३१॥
घेऊनि तेथील एक श्रीफळ । देऊनि पुंडलीकरावांजवळ ॥
म्हणाले वंदूनि बंधू पदकमळ । अर्पा हें शिर्डीस जाल तेव्हां ॥१३२ ॥
सांगा माझा नमस्कार । म्हणा असों द्या कृपा या दीनावर ॥
पडूं न द्यावा याचा विसर । प्रेम निरंतर वाढावें ॥ १३३ ॥

---

१ कीर्तिरूप भागीरथी. २ नांदेडचे प्रसिद्ध वकील.

तुम्ही शिरडी ग्रामालागून । पुनश्च जेव्हां कराल गमन ॥
करा हें माझे बंधूस अर्पण । आदरें स्मरणपूर्वक ॥ १३४ ॥
आम्ही स्वामी न करावें वंदन । असें जरीं हे आम्हा निर्बंधन ॥
परि त्या नियमाचें करणें उल्लंघन । प्रसंगीं कल्याणकारक ॥ १३५
म्हणूनि घेतां साईदर्शन । होऊं न द्या या गोष्टीचें विस्मरण ॥
साईपदीं हें श्रीफळ अर्पण । करा कीं स्मरणपूर्वक ॥ १३६ ॥
ऐकोनियां तयांच्या वचना । पुंडलीकराव लागती चरणां ॥
म्हणती जैसी स्वामीची अनुज्ञा । आणीन आचरणा ती तैसी ॥१३
करोनि आज्ञा शिरसामान्य । येणें मी आपणा मानितों धन्य ॥
स्वामीस शरण जाऊनि अनन्य । निघाले तेथून पुंडलिकराव ॥१३
स्वामी जे बाबांस बंधू वदत । ते काय होतें अवघे निरर्थ ॥
'यावज्जीवमग्नि होत्रंजुहुयात' । बाबा या श्रुतिसंमत वर्तत ॥१३
जन जया धुनी वदत । ती बाबांचे सन्मुख नित ॥
अष्टौ प्रहर होती प्रज्वलित । हें बाबांचें व्रत होतें ॥ १४० ॥
चित्तशुद्धि द्वाराप्रमाण । अग्निहोत्र कर्मादि साधन ॥
ब्रह्मप्राप्त्यर्थ करीत धारण । लोकसंग्रह कारण जें ॥ १४१ ॥
श्रीवासुदेवानंद सरस्वती । तेही यती तैसेच व्रती ॥
मग ते बाबांस बंधू म्हणती । ही काय उक्ति वैयर्थिक[1] ॥ १४२॥
पुढें संपला नाहीं जों महिना । सवें घेऊन चार मित्रांना ॥
योग आला पुंडलीकरावांना । निघाया दर्शना साईचे ॥ १४३ ॥
घेतलें सामान फळफळावळ । स्मरणपूर्वक घेतला नारळ ॥
साईदर्शना निघाले सकळ । आनंदें अविकळ मानसें ॥ १४४ ॥

---

१ निरर्थक.

पुढें मनमाडास उतरल्यावर । कोपरगावाची गाडी सुटल्यावर ॥
अवकाश म्हणून गेले ओढयावर । तृषाही फार लागली ॥ १४५ ॥

अनशेपोटीं नुसतें पाणी । पीतां होईल प्रकृतीस हानी ॥
म्हणून एक पुरचुंडी आणी । चिवडयाची कोणी फराळा ॥ १४६ ॥

तोंडांत घालितो चिवडयाचि चिपुट । चिवडा लागला अत्यंत तिखट ॥
नारळावांचूनि चिवडा फुकट । जाहली खटपट ही व्यर्थ ॥ १४७ ॥

तेव्हां एक म्हणे त्यां सकळां । युक्ति एक आठवली मला ॥
नारळ फोडून चिवडयांत मिसळा । पहा मग ती कळा चिवडयाची॥१४८

नारळ म्हणतां नारळ तयार । फोडावयास कैचा उशिर ॥
मिसळतां चिवडा लागला रुचकर । प्याले मग त्यावर ते पाणी॥१४९॥

नारळ म्हणतां नारळ आला । तो कोणाचा नाहीं विचारिला ॥
क्षुधेनें ऐसा कहर केला । विसर पाडिला अवघयाचा ॥ १५० ॥

असो पुढें गेले ठिकाणीं । कोपरगांवचे गाडींत बसुनी ॥
मार्गी पुंडलीकरावां लागुनी । आठवला मनीं नारळ ॥ १५१ ॥

आली पाहुनी शिर्डी जवळ । पुंडलीकरावां लागली तळमळ ॥
वासुदेवानंदांचेंच श्रीफळ । चुकीनें चिवडयांत मिसळलें ॥ १५२ ॥

कळले जेव्हां नारळ फुटला । पुंडलीकराव भयें दाटला ।
सर्व अंगा कंप सुटला । अपराध घडला संताचा ॥ १५३ ॥

जाहला तया अति संताप । जोडलें तरी केवढें पाप ॥
पडतील माथां स्वामीचे शाप । झाले ते प्रलाप व्यर्थ माझे ॥ १५४ ॥

श्रीफळाची ऐसी गत । व्हावी पहातां मोठी फसगत ॥
पुंडलीकरावांचें चित्त । विस्मयें तटस्थ जाहलें ॥ १५५ ॥

आतां काय बाबांस देऊं । कैसिया रीती त्यां समजाऊं ।
कैसें मी तयां वदन दाऊं । श्रीफळ गमाऊन बैसलों ॥ १५६ ॥

होणार साईचरणीं समर्पण । फराळ त्याचा जाहला पाहून ॥
पुंडलीकराव मनीं खिन्न । म्हणाले हा अपमान संताचा ॥ १५७ ॥

आतां जैं बाबा मागती नारळ । अधोवदन होतील सकळ ॥
कारण मनमाडावर त्याचा फराळ । केला ही खळमळ सर्वांतरीं॥१५८॥

नारळ नाहीं जवळ आज । खरें सांगावें तरी लाज ॥
खोटें सांगून भागे ना काज । साईमहाराज सर्वसाक्षी ॥ १५९ ॥

असो साईंचें घेतां दर्शन । मंडळी झाली सुखसंपन्न ॥
आनंदाश्रुपूर्ण नयन । प्रसन्नवदन ते सकळ ॥ १६० ॥

आतां आम्ही अहर्निश । पाठवितों बिनतारेचे संदेश ॥
दिमाख याचा दावितों विशेष । अभिमानवश होऊनी ॥ १६१ ॥

यदर्थ उभारूं लागती स्थानें । लागे अपार पैका खर्चणें ॥
तेथें हीं संतांस न लगती साधनें । पाठविती मनेंच संदेश ॥ १६२ ॥

स्वामीनीं पुंडलीकरावांस । नारळ दिधला ते समयास ॥
पाठविला होता साईनाथांस । पूर्वींच हा संदेश बिनतारी ॥ १६३ ॥

पुंडलीकराव घेतां दर्शन । साईबाबा आपण होऊन ॥
म्हणाले माझी वस्तू आण । बंधूच्या जवळून आलेली ॥ १६४ ॥

मग तो खिन्न पुंडलीकराय । धरूनियां श्रीबाबांचे पाय ।
म्हणे क्षमेवीण दुसरा उपाय । नाहीं मज काय सांगूं मी ॥ १६५ ॥

नारळाची मज आठव होती । परी भुकेची करावया तृप्ति ॥
आम्ही जंव गेलों ओढियावरती । जाहली विस्मृति सकळांस ॥ १६६ ॥

तेथें चिवडयाचा करितां फराळ। फोडूनि मिसळला हाच कीं नारळ॥
म्हणूनि आणितों दुसरें श्रीफळ। स्वीकारा निश्चळ मानसें॥ १६७॥
ऐसें म्हणूनि उठूं लागतां। पुंडलीकराव फळाकरितां॥
साईमहाराज धरोनि हस्तां। तया निवारितां देखिले॥ १६८॥
नुणतां घडला विश्वासघात। कृपाळू आपण घ्या पदरांत॥
क्षमस्व व्हा मज कृपावंत। असें मी नितांत अपराधी॥ १६९॥
स्वामीसारिखा साधू सज्जन। अवगणूनी तयांचें वचन॥
करावें जें आपणा अर्पण। तें म्यां भक्षण फळ केलें॥ १७०॥
हा तो संताचा अतिक्रम। केवढा मी अपराधी परम॥
आहे काय या पापा उपरम। कैसा मी बेशरम जाहलों॥ १७१॥
तव ही ऐकतां झालेली मात। हांसूनि बोलले श्रीसाईनाथ॥
द्यावा कशास नारळ हातांत। ठेवणें व्यवस्थित जरि नव्हतें॥ १७२॥
तुम्ही माझी वस्तू मजप्रत। द्याल ऐसें जाणूनि निश्चित॥
माझ्या बंधूनें तुमचिया बोलांत। विश्वास अत्यंत ठेवला॥ १७३॥
त्याचा का व्हावा हा परिणाम। हेच कां तुम्ही विश्वासधाम॥
पुरला न माझ्या बंधूचा काम। ऐसेंच का काम हें तुमचें॥ १७४॥
म्हणाले त्या फळाची योग्यता। येईना इतर कितीही देतां॥
घडावयाचें घडलें आतां। व्यर्थ दुश्चित्तता किमर्थ॥ १७५॥
स्वामींनीं जो दिधला नारळ। तोही माझाच संकल्प केवळ॥
माझ्याच संकल्पें फुटलें तें फळ। अभिमान निर्फळ कां धरिसी॥१७६॥
अहंकाराची धरिसी बुद्धी। तेणें अपणा मानिसी अपराधी॥
एवढें निरहंकर्तृत्व साधी। अवघी उपाधी चुकेल॥ १७७॥